# निधन वार्ता



## पुंडलिक तुळशीराम बागुल

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी ।** शहरातील रेणुकानगरातील रहिवासी तसेच मुक्ताईनगर आगारातील सेवानिवृत्त वाहक पुंडलिक तुळशीराम बागुल यांचे दि.१ जून २०२६ रोजी अल्पश: आजाराने निधन झाले. ते संदीप पुंडलिक बागुल अभियंता (मोहाडीकर) यांचे वडील होत.



## विजय त्र्यंबक चोपडे

**न्हावी, ता.यावल । वार्ताहर ।** येथील बस स्टॅन्ड चौकातील रहिवासी विजय त्र्यंबक चोपडे (वय ५०) यांचे दि.२९ मे २०२६ रोजी अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, दोन भाऊ असा परिवार आहे. ते येथील त्र्यंबक चोपडे यांचा मोठा मुलगा तसेच राजेंद्र व विष्णू चोपडे यांचे मोठे भाऊ होत.



## चुडामण गिरधर बेंडाळे

**जळगाव । प्रतिनिधी ।** जीवन नगर येथील रहिवासी, सेवानिवृत्त शिक्षक चुडामण गिरधर बेंडाळे (वय ७६) यांचे दि.२९ मे २०२६ रोजी पहाटे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते डॉ.महेंद्र व स्वप्निल बेंडाळे यांचे वडिल होत.



## मनोज मधुकर साळुंखे

**चाळीसगाव । प्रतिनिधी ।** शहरालगत असलेल्या टाकळी प्र.चा.येथील रहिवासी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक मनोज मधुकर साळुंखे (वय ४५) यांचे नाशिक येथे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले असा परिवार आहे.

# तिलाली येथे जमिनीच्या वादातून शेतकऱ्याचा मृत्यू

नंदुरबार । प्रतिनिधी

तालुक्यातील तिलाली येथे जमिनीच्या वादातून एका ज्येष्ठ शेतकऱ्याचा धक्कादायक मृत्यू झाल्याची घटना आज घडली. शेतातील सहा एकर जमीन कंपनीच्या नावावर असल्याची माहिती संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर मानसिक धक्का बसून नामदेव तुळशीराम पाटील (वय ७५) यांचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून संतप्त नातेवाईकांनी सुझलॉन कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावण्याची मागणी करत मृतदेह शेतातून हलविण्यास नकार दिला.

याबाबत उपलब्ध माहितीनुसार, तिलाली येथील रहिवासी नामदेव पाटील यांच्या शेतातील सुमारे २५ गुंठे जमिनीवर सुझलॉन कंपनीने सुमारे २० वर्षांपूर्वी टॉवर उभारणीसाठी करार केला होता. या कराराची मुदत संपून जवळपास चार वर्षे उलटून गेली असतानाही कंपनीची वाहने शेतातून ये-जा करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत नामदेव पाटील यांनी अनेक वेळा कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना करार संपल्याचे सांगून शेतातून वाहने नेऊ नयेत, अशी विनंती केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत दोन दिवसांचा वेळ मागितल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. दरम्यान, रविवारी सकाळी पुन्हा कंपनीची काही वाहने शेतात दाखल झाली. यावेळी नामदेव पाटील यांनी वाहने अडवून याबाबत जाब विचारला. त्यानंतर कंपनीचे काही अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी काही कागदपत्रे दाखवत संबंधित सहा एकर जमीन कंपनीच्या नावावर असल्याचे सांगितल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे. ही माहिती ऐकल्यानंतर नामदेव पाटील यांना मोठा मानसिक धक्का बसला. त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याचे नातेवाईकांनी सांगितले. आज दिनांक १ जून रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

पान १ वरुन...

## अभद्र युतीतून मानवी जीवाचा सौदा

हप्तेखोरीचे बळ होते, हे उघड गुपित आहे. दुर्घटना घडली की तीन पोलीस अधिकार्यांना निलंबित करायचे आणि सीआयडी तपासाचे गाजर दाखवून जनक्षोभ शांत करायचा, हा प्रशासनाचा ठरलेला 'फॉलो-अप पॅटर्न' आहे. पण निलंबित झालेले अधिकारी काही महिन्यांत पुन्हा सेवेत रुजू होतात आणि मृत्यूचा हा खेळ नव्या नावांनी पुन्हा सुरू होतो. दुसरीकडे, विरोधक यावर केवळ राजकारण करत आहेत. महाराष्ट्रात संस्कृतीचे अवमूल्यन होत असल्याचा आणि राज्य बिहारच्या वाटेवर निघाल्याचा टाहो फोडला जात आहे. जनसामान्यांचा संताप अनावर होऊन पक्षाचे कार्यकर्ते दारूचे अड्डे तोडत आहेत; पण हेच अड्डे जेव्हा पोलिसांच्या नाकाखाली वर्षानुवर्षे चालत होते, तेव्हा सर्वपक्षीय नेते गप्प का होते? राजकीय नेत्यांचे वरदहस्त आणि गुन्हेगारांचे साटेलोटे असल्याशिवाय शहराच्या उपनगरांमध्ये गरिबांचे संसार असे उघड्यावर पडूच शकत नाहीत. मृतांमध्ये सर्वाधिक संख्या ही रोजंदारीवर काम करणार्या मजुरांची आणि गवंडी कामगारांची आहे. हातावर पोट असणारा हा वर्ग, जो दिवसभर हाडे झिजवून रात्री शांततेसाठी अशा अवैध अड्ड्यांची पायरी चढतो. त्यांचे हे व्यसन गैर असेलही; पण म्हणून त्यांना 'विष' पाजून मारण्याचा अधिकार या नराधमांना कोणी दिला? या १९ जणांच्या मृत्यूमुळे कित्येक लहान मुले अनाथ झाली. अकाली वैधव्य आलेल्या या माता-भगिनींच्या उद्ध्वस्त झालेल्या संसाराची किंमत सरकार कोणत्या निकषावर लावणार आहे? आता कोरड्या सहानुभूतीचे आणि पोकळ घोषणांचे सोपस्कार बंद झाले पाहिजेत. जर गृह विभागाला खरोखरच ही विषारी साखळी नष्ट करायची असेल, तर केवळ दारू गाळणार्यांना नाही, तर त्यांना अभय देणार्या खाकी वर्दीतील पांढरपेशी दलालांना थेट तुरुंगात डांबले पाहिजे. जोपर्यंत हप्ते घेणार्या एकाही बड्या अधिकार्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत या मृत्यूच्या भट्ट्या कायमच्या विझणार नाहीत. पुण्याचे हे दारूकांड म्हणजे महाराष्ट्राच्या कायदा-सुव्यवस्थेच्या मृतदेहावर पडलेले कफन आहे. सरकारने आता तरी या टोळभैरवांचा आणि भ्रष्ट अधिकार्यांचा समूळ उच्चाटन करून 'राजेपण' सिद्ध करावे; अन्यथा जनतेचा हा संताप या सडलेल्या व्यवस्थेलाच जाळून खाक केल्याशिवाय राहणार नाही.

## विधान परिषद निवडणुकीत भाजपा उमेदवार...

आघाडीतर्फे शिवसेना ठाकरे गटाचे शरद शामराव तायडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच प्रवीण गंगाराम पाटील, चौधरी निलेश सुरेश, आसिफ मोहम्मद दारा मोहम्मद, सुनील नेमिदास जंगले, शेख दानिश शेख निसार, जावेद इकबाल अब्दुल रशीद, शरद शामराव तायडे, सचिन संतोष चौधरी, अनिल छबिलदास चौधरी, रेश्मा कुंदन काळे, दीपक काशिनाथ धांडे, निलेश गणेश झोपे, कलीमखान हैदरखान मनियार, हितेंद्र रमेश देशमुख आणि घृष्णेश्वर रामकृष्ण पाटील यांनी अपक्ष म्हणून उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे.

# पुन्हा वादळी वाऱ्याचा तडाखा; केळी बागांसह पिकांचे मोठे नुकसान

रावेर । प्रतिनिधी

रावेर तालुक्यात सोमवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने पुन्हा एकदा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. तालुक्यातील अहिरवाडी, मोहगण, निरूळ व पाडळा, विवरे या सह परिसरात वादळी वाऱ्यामुळे केळी बागांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी केळीची झाडे उन्मळून पडली असून काही ठिकाणी संपूर्ण बागाच जमीनदोस्त झाल्या आहेत. अहिरवाडी परिसरात गारपीटही झाल्याने पिकांचे अधिक नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या या संकटामुळे हिरावला गेला असून आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांपुढे नव्या संकटाचे ढग निर्माण झाले आहेत. बागांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी शासन व प्रशासनाकडे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली आहे. कृषी विभाग व महसूल प्रशासनाने तत्काळ पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी बांधवांकडून होत आहे.

# वादळाने झाड पडले आणि विप्रो बोगद्यातील वाहतूक बंद

अमळनेर । प्रतिनिधी

वादळाने झाड पडले ...आणि विप्रो बोगद्यातील वाहतूक बंद पडली ...कायदा झाड बाजूला करू देत नव्हता ...प्रसूतीला दवाखान्यात जाणारी महिला रस्त्यात अडकून पडली होती....अखेर माजी नगरसेवक मुख्तार खाटीक पुढे आले आणि त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून रस्ता मोकळा केला आणि सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. जोराने वादळ आले आणि विप्रो कंपनीकडे जाणाऱ्या रेल्वे बोगद्यात झाड आडवे पडले. तांबेपुरा , सानेनगर , नन्दगाव , लडगाव , तासखेडा ,अंतुर्ली ,रंजाणे ,अंबारे , खापरखेडा , करणखेडा, मुडी ,दरेंगाव , हिंगोणे आदी गावांना जाणारा रस्ता बंद पडला. झाड रेल्वे हद्दीत असल्याने आर पी एफ हात लावू देत नव्हते. आणि मुळात विप्रो बोगदा हा रस्ता नव्हे हा नाला आहे त्यामुळे येथून वाहतूक करू नये असे फलक यापूर्वीच रेल्वे प्रशासनाने लावून ठेवल्याने रेल्वे प्रशासन झाड देखील हटवू देत नव्हते. हा नेहमीचा रस्ता असल्याने वाहतूक अडकली होती. पलीकडे एक महिला प्रसूतीसाठी जात असताना रस्त्यात अडकली होती. अखेर घटनेचे वृत्त कळताच माजी नगरसेवक मुख्तार खाटीक त्याठिकाणी आले. मात्र आर पी एफ यांनी विरोध केला. परिस्थितीचा विचार करून खाटीक यांनी रेल्वे प्रशासनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. विनंती करून झाड तोडायचा खर्च करून तुमच्या हद्दीतच झाड टाकतो मात्र झाड कापून रस्ता मोकळा करणे अत्यावश्यक आहे. दैनंदिन जीवनावर परिणाम होईल असे सांगून रेल्वे अधिकाऱ्यांचे मन वळवले. प्रशासनाला देखील माणुसकीचा पाझर फुटला आणि नियमात लवचिकता आणून गुलाम नबी यांच्याकडून झाड कापून रस्ता मोकळा केला. नागरिकांनी समाधान व्यक्त करत मुख्तार खाटीक यांचे आभार मानले.

# पाचोऱ्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

पाचोरा । प्रतिनिधी

पाचोरा शहरासह परिसरात सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास वादळासह जोरदार पाऊस सुरू झाल्याने व्यापाऱ्यासह चाकरमान्यांची धावपळ सुरू झाली होती. अचानक सुरू झालेल्या पावसामुळे सगळ्यांचाच गोंधळ उडाला.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या काही व्यापारी बांधवांनी दुपारपासून आपला माल सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची तयारी सुरू केल्याने नुकसानी पासुन मालाचा बचाव झाला आहे. तर काही धान्याचे ढीग बाहेर पडले आहेत. शहरात वादळ व पाऊस सुरू झाल्याने संपूर्ण शहरातील विज पुरवठा खंडीत झाला होता, त्यामुळे परीसरात अंधाराचे साम्राज्य पसरले होते, वारा, पाऊस,व अंधारामुळे जनजीवन विस्कळित झाले होते. वादळामुळे कुठे विजेच्या तारा फांद्या पडून तुटल्या असतील तर नागरीकांना रात्रभर झोप मुश्किल होणार आहे. उन्हाळ्यात तापलेल्या जमिनीवर पावसाचा शिडकावा झाल्याने नागरीकांना नक्कीच उकाड्याचा सामना करावा लागणार आहे. मात्र तापमानात घट होणार आहे.

जोरदार वाऱ्यासह पाऊस जवळपास तासभर सुरू असल्याने घराकडे परतीचा प्रवास करणाऱ्यांना पावसातच परतावे लागत होते. जोरदार हवेमुळे वाहनेही सरळ चालायला अडचणी येत होत्या तसाच मार्ग काढत नागरीक घराची वाट धरत होते.

पुनगांव रोडवरील एक झाड चार चाकी वाहनावर पडल्याने वाहनाचे नुकसान झाले आहे. या पहिल्या पहिल्याच पावसात लोकांची मोठी धावपळ उडाली होती.

## पात्र असणाऱ्या लाडक्या बहिणी लाभापासून वंचित; पाडळसे परिसरात संतापाची लाट!

पाडळसे, ता. यावल । वार्ताहर

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ मिळण्यासाठी सर्व निकष पूर्ण करूनही, पाडळसे गावांसह परिसरातील अनेक गावांमधील शेकडो पात्र महिलांना या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागले आहे. सर्व नियम पाळूनही प्रशासनाने तांत्रिक कारणांमुळे महिलांना अपात्र ठरवल्याने, लाभार्थ्यांमध्ये शासनाच्या विरोधात तीव्र नाराजी पसरली असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाडळसे आणि परिसरातील अनेक महिलांनी योजनेचे सर्व नियम व अटी पूर्ण करून ऑनलाईन अर्ज सादर केले होते. मात्र, एप्रिल आणि मे महिन्याचा हप्ता या महिलांच्या खात्यात जमा झाला नाही. उलट, पात्र असतानाही अनेक महिलांचे अर्ज अपात्र दाखवण्यात आल्याने महिलांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. अधिकाऱ्यांची टोलवाटोलवी; यंत्रणा नसल्याचे अजब कारण! या अन्यायाबाबत पाडळसे परिसरातील महिलांनी संघटित होऊन यावल येथील 'महिला व बालविकास कल्याण विभाग' कार्यालयात जाऊन चौकशी केली. मात्र, येथील अधिकाऱ्यांनी आमच्याकडे यंत्रणा उपलब्ध नाही, असे अजब उत्तर देत हात वर केले.

## अमळनेर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी; रक्तदान शिबिरात दात्यांचा सत्कार



अमळनेर । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती नुकतीच ३१ मे २०२६ रोजी अमळनेर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून 'आम आदमी पार्टी' (आप) तालुका अमळनेरच्या वतीने एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पाहुणे म्हणून खासदार स्मिताताई वाघ, त्यांची कन्या भैरवी फलांडे आणि आमदार अनिल भाईदास पाटील उपस्थित होते. या रक्तदान शिबिराचे आयोजन आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष महेंद्र साळुंखे आणि दीक्षा महेंद्र साळुंखे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष रामकृष्ण पाटील व वंदना रामकृष्ण पाटील, मुख्य सल्लागार मोहन मोरे, सुधाकर गजे, राजेंद्र बाळकृष्ण जाधव, ललित सातपुते, राजू धनगर आणि शेजत खाटीक यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिल्कत तिचे विद्यमान मालक सौ. प्रमिला गोकुळ पाटील, रा. बाळापुर, ता. जि. धुळे यांनी आमचे अशिलांना कायम विक्री करण्याचा सौदा केला असून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध, निर्बीज व निजोखमी असून ती विकी करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरहु मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना लवकरच पुर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, मृत्युपत्र, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, आरक्षण, सॉल्वन्सी, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटुन आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

परिशिष्ट :- मौजे अंचलवाडी, ता. अमळनेर, जि. जळगांव येथील शेत जमीन गट नं. १७६ चे क्षेत्र ला.ला. १ हे. ४६ आर, पो.ख. ० हे. ०६ आर, आकार रू. ३.१९ पैसे, यांसी चतु: सिमा मंजुर गांव नकाशा प्रमाणे. सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : ०१/०६/२०२६
**ॲड.विजय म. मोरे**
**रा.बी./१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे. मोबा.९८२२८५२६५०**

## नशिबाची परीक्षा

मंगळवार २/६/२०२६

*** मिलन डे ***
१९० २८० २२६ **० – ६** १२३ ४४८ ८८० | सिंगल ०-२-७
जोड ०१-५६-२४-७३-६९

*** कल्याण बाजार ***
१८० २८९ २२५ **९ – ३** १२० १३९ ३३७ | सिंगल ९-८-१
जोड ९०-४३-८६-१२-३५

*** मुंबई (मेन) बाजार ***
१४० २३० ७८० **५ – ४** १३० २४८ ६८० | सिंगल ५-२-०
जोड ५६-९४-२३-०८-४७

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये. मो.९९७५४७९८२६

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १३-४ २०२६ १८-०४-२०२६ | ७८८ ३० ११० | ४६० ०३ २२९ | ४५८ ७७ २६९ | १४० ५३ ५९९ | २७९ ८९ ४६९ | ४९० ३३ १२० |
| २०-४ २०२६ २५-०४-२०२६ | ३४८ ५३ १४८ | ६९० ५२ ४८० | ४५५ ४८ ४५९ | ४७९ ०४ २२० | ४६८ ८३ २५६ | २६९ ७९ ४५० |
| २७-४ २०२६ ०२-०५-२०२६ | १७९ ७९ १३५ | ४६९ ९८ २२४ | ८९० ७५ ३४८ | २५३ ३७ २६९ | १८० ९७ २५० | १२३ ६८ ४५९ |
| ०४-५ २०२६ ०९-०५-२०२६ | १८० ९५ ३३९ | १३७ १३ १४८ | ५६८ ९५ १६८ | ६९० ५१ २३६ | ३५५ ३४ १६७ | १३७ १८ २८८ |
| ११-५ २०२६ १६-०५-२०२६ | ५८८ १४ ७७० | ५७९ १४ ५९० | ६७० ३२ ६७९ | ६७९ २० ४७९ | २३४ ९३ २५६ | ३६८ ७८ २७९ |
| १८-५ २०२६ २३-०५-२०२६ | ५६७ ८९ १२६ | ३३० ६४ ३४७ | ३३० ६४ ३४७ | १५६ २४ १३० | १२७ ०० १९० | ६७८ १३ २३८ |
| २५-५ २०२६ ३०-०५-२०२६ | ५५७ ७२ २५५ | ८९० ७१ १२८ | ६७९ २१ २९० | १२४ ७५ ३५७ | १३७ १५ २४९ | १४४ ९५ ७८० |
| १-६ २०२६ ६-०५-२०२६ | २२६ ०२ १५६ | | | | | |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| २२४ ८५ २४९ | ११० २६ २४० | ४६० ०७ ४५८ | ५६८ ९० ४७९ | १८९ ८१ ३८० | ४६८ ८४ ३५६ |
| ४५७ ६५ २५८ | ४४९ ७० १९० | ३३३ ९० ६७७ | ४९० ३६ १५० | १८८ ७७ १७९ | २३४ ९० २८० |
| ४४८ ६१ ११९ | १३७ ११ २८९ | २८९ ९३ २४७ | ४६९ ९६ २६८ | ५९९ ३२ ३४५ | १२८ १६ २४० |
| २३५ ०३ २४७ | ६७८ ११ ३८० | १९० ०२ २४६ | ११८ ०४ १६७ | २७९ ८३ १४८ | ४९० ३६ ३४९ |
| १२८ १३ ५८० | २६० ८६ १६९ | १४८ ३८ १८९ | २८९ ९२ ३४५ | १२३ ६८ २८८ | ३७० ०८ ३५० |
| ३६९ ८१ १४६ | ३६९ ८१ १४६ | १४६ १८ १७० | १२५ ८३ ५८० | ६६८ ०६ ४६६ | १३६ ०४ १४९ |
| १७० ८४ १५८ | ३५५ ३८ ४५९ | ४५० ९० ३८९ | २९० १६ ४६६ | २३७ २५ २५८ | १३५ ९८ ४५९ |
| | | | | | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १३-०४ २०२६ १८-०४-२०२६ | १५९ ५९ ४७८ | ४८० २७ ७०० | ३५० ८३ ७८८ | ४६७ ७६ ३४६ | ३५६ ४९ ३६० | १२५ ८२ ६७९ |
| २०-०४ २०२६ २५-०४-२०२६ | १४७ २७ १८८ | २८० ०३ ३५५ | १९० ०४ १६७ | २२४ ८० ४७९ | ८९० ७९ २३४ | ३६० ९७ ५६६ |
| २७-०४ २०२६ ०२-०५-२०२६ | ३५९ ७० ४६० | १४४ ९३ ५९९ | ८८९ ५६ ४६६ | ३८८ ९७ ३४० | ११२ ४१ २३६ | ५५६ ६८ १८९ |
| ०४-०५ २०२६ ०९-०५-२०२६ | ४८० २० १४५ | ७८८ ३२ ५७० | १३९ ३७ २७८ | १६० ७५ २५८ | १२३ ६९ ३६० | ४८० २४ १६७ |
| ११-०५ २०२६ १६-०५-२०२६ | ४८९ १२ ३४५ | ४७८ ९१ ७७७ | २४७ ३४ ७८९ | १३८ २९ ५६८ | १७० ८३ २५३ | २४५ १० ४७९ |
| १८-०५ २०२६ २३-०५-२०२६ | २६७ ५७ १२४ | २४५ १७ ४६७ | १५९ ५८ २७९ | २५७ ४२ १३८ | २५७ ४२ १३८ | ३७८ ८६ १५० |
| २५-०५ २०२६ ३०-०५-२०२६ | ६७९ २४ ४०० | ५९० ४० ३३४ | २३६ १७ १७९ | २४० ६४ १३० | १३७ १५ २४९ | १८८ ७५ १५९ |
| १-०६ २०२६ ६-०६-२०२६ | ४९९ २० २३५ | | | | | |


## पांढरे डाग

२४ तासातच फरक सुरू. पांढरे डाग (कोड), त्वचारोग, गुप्तरोग व लैंगिक समस्यांवर शंभर टक्के गॅरेंटेड उपचार. सौरॉयसीस, मुहाँसे, काळे चट्टे, सर्व प्रकारचे त्वचारोग व गुप्तरोग, हस्तमैथुन, शिघ्रपतन, स्वप्नदोष, लिंग लहान, बारीक, तिरपे, चाळीशीनंतरच्या काम समस्या, शुगरमुळे येणारी नस कमजोरी, नपुंसकता व नसांच्या कमजोरीवर उपचार. वयाची अट नाही. आजच भेटा. कायमचा पत्ता-डॉ. प्रणव पटेल (MBBS), रेल्वे स्टेशनसमोर, डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ, एच.पी.निरंजन पेट्रोल पंप, नाशिकरोड, नाशिक. मो. ९४२२२८३९३०. हजारो पेशंट बरे झालेत. इतर शाखा- नाशिक, भुसावळ, पुणे, मुंबई, जळगाव, धुळे. कुरिअरची सुविधा. (१६/०४/२०२७)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

देशदूत 'CLASSIFIED'

सूचना वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत'वृतपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृतपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

## पाहिजेत

हेअर कटिंग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहिजेत. न्हावी समाजाच्या गरीब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीकपासून ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यंत मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहण्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क-९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९. (CM-396320/3/1/27)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/चिकून गुनिया,जुनाट ॲलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752(VM.17/01/27. CRINIV-2526JL/CRG00550)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

## दारु बंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसअॅप डॉ.पालवे, अॅडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... * व्यसन पेंशटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....र्सव सुविधांना परीपुर्ण :-*व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...ॲडमिट सुविधा... *(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.(VM.17/01/27.CRINIV-2526JL/CRG00550)

## ज्योतीषविषयक

जीवनातील कठिन व जटिल समस्यांचे, शिक्षण, नौकरी, व्यवसाय, प्रेम विवाह, कोर्ट कचेरी, स्वास्थ्य, कोणतेही कामात बाधा येणे, १०१% कायमस्वरूपी प्रभावी उपाय।तीन पीढ़ी पासून, श्रीभृगु ज्योतिष (मां गायत्री उपासक), गुजराल पेट्रोल पंप, जळगाव मो. ९८२२७७४१५१ (व्हीएम २५/६/२०२६)

## इलेक्ट्रॉनिक वजनकाटे

फिनिक्स, सॅनसुई, हॅवल्स, एक्सपर्ट ईगल सर्व ब्रान्डेड कंपन्यांचे इलेक्ट्रॉनिक वजनकाटे होलसेल किमंतीत अधिकृत विक्री व दुरुस्ती धनश्री इलेक्ट्रॉनिक्स, गोलाणी मार्केट, जळगाव-९४२२५६६३११. (व्हीएम-०७/०७/२०२६)

## १००% व्यसनमुक्ती

*गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क :9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगांव. (VM.17/01/27.CRINIV-2526JL/CRG00550)

## इंग्रजी शिकायचे?

DAMBELKARS SPOKEN ENGLISH CLASSES, Jr KG, बालवाडी पासुन ते सर्व वयापर्यंत प्रवेश सुरु, "एकदा फी भरली कि जीवन भर क्लासेस मोफत",जळगांव, भुसावळ, धुळे, शिरपुर,मो.9325562488 (VM 18 AUG 2026)


**सोमवार १/६/२०२६**
**कल्याण - २२६-०२-१५६**
**मिलन डे - ४९९-२०-२३५**

**रविवार ३१/५/२०२६**
**मेन बाजार -**
**मिलन ना. -**